सर्वज्ञानी श्रेष्ठ की सर्वज्ञानी नसलेला?

एकदा व्यवस्थापन कौशल्य विकसन प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात एक रंजक मुद्दा चर्चेला आला. " सर्वज्ञानी श्रेष्ठ की सर्वज्ञानी नसलेला? "/ कोणाची निवड कराल? सर्वज्ञानी की सर्वज्ञानी नसलेला?सर्वांचा उत्स्फूर्त प्रथम प्रतिसाद आला - सर्वज्ञानी! पण नंतरच्या चर्चेनंतर सर्वांनी हे मान्य केले की सर्वज्ञानी ही आदर्शवादी कल्पना आहे, वास्तव नव्हे.

जी व्यक्ती स्वतःस सर्वज्ञानी समजते, ती खरे म्हणजे मुर्खाच्या नंदनवनात राहत असते. ती खरे म्हणजे सर्वज्ञानी नसून मूर्ख आहे. मग जी स्वतःस सर्वज्ञानी म्हणत नाही, ती सर्वज्ञानी सांगणाऱ्यापेक्षा श्रेष्ठ समजावी काय ? कदाचित हो, जर तिला आपल्या विविध विषयातील ज्ञानाच्या मर्यादांची जाणीव आहे
आणि जरूर तेव्हा आवश्यक विषयातील, स्वतःपेक्षा अधिक ज्ञानी माणसाशी संपर्क साधून, आपली उणीव भरून काढण्याची इच्छा आहे, प्रयत्न करण्याची तयारी आहे, ती श्रेष्ठ. हे महत्वाचे आहे की त्या व्यक्तीस अशा अधिक ज्ञानी व्यक्ती ठाऊक आहेत आणि त्यांच्याशी चांगले संबंध आहेत, भले त्या इतर व्यक्ती त्या विषयातील सर्वोच्य तज्ज्ञ नसतील.

या चर्चेमधून एका महत्वाच्या संसाधनाच ( रिसॉर्सचे )महत्व अधोरेखित होते. जे संसाधन प्रयत्नपूर्वक मिळवून सतत विकसित करणे हे यशस्वी व्यक्तीस गरजेचे आहे. हे संसाधन आहे " नेटवर्किंग" / सम्पर्क जाळे विकसन. " विविध क्षेत्रातील विशेष ज्ञानी व्यक्तीशी अखंडित संपर्कात राहण्याचे कौशल्य. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्वतः जवळ नसलेल्या विशिष्ट ज्ञानाची अचानकपणे गरज पडू शकते. अशावेळी हे नेटवर्क मोलाचे ठरते. व्यवसाय आणि त्याचे व्यवस्थापन करताना आपल्याला विविध प्रकारच्या विविध पातळीवरील ज्ञानाची माहिती असलेल्या व्यक्तींची मदत होऊ शकते. या कारणामुळे गरज लागण्यापूर्वीच, अशा संभाव्य ज्ञानक्षेत्रातील व्यक्तींशी नेटवर्क करणे आणि ते विकसित करत राहणे हे सर्वांना आवश्यक झाले आहे.

याचा फायदा हा की तुम्हाला स्वतःस जरूरीच्या विषयातील ज्ञान हे तज्ञाच्या पातळीचे शिकावे लागत नाही, परंतु नेटवर्क मधील तज्ञाना योग्य प्रश्न योग्य रीतीने विचारून माहिती मिळावीता येईल इतपत शिकावे लागेल. अर्थात निर्णय व वापर तुम्ही करणार आहात.
सूक्ष्म आणि अचूक माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी विविध विषयातील तज्ञाचे गट / संघटना /ग्रुप असतात, त्याचाही उपयोग करून घेता येतो.

नेटवर्क असणे म्हणजे तज्ज्ञची अथवा संघटनाची नावे व दूरध्वनी क्रमांक असणे नव्हे, तर अशा प्रतिसाद देऊ शकणाऱ्या तज्ञाशी जवळीक व मैत्रीपूर्ण संबंध असणे. तुम्ही जर असे नेटवर्क प्रस्तापित व विकसित कराल तर जरुरीच्या विषयातील संपूर्ण व खोलवर ज्ञान मिळविण्याच्या जबाबदारीतून स्वतःस मुक्त करून तो वेळ व ते प्रयत्न वापरून आपल्या जबाबदाऱ्या त्वरित, कार्यक्षमतेने आणि अर्थपूर्णपणे पर पाडू शकाल.

Hope you receive it now. Do acknowledge. May require some modification only at one place, depending on title to choose. I suggest, whom to select/ choose( कोणाची निवड कराल ). In that case from line 2 and 3, retain second part and remove first. In proof reading one or two places require correction. I could not do with my typing in devnagari font.
एक दो जगह अनुस्वार जरुरी है और तज्ञ या तज्ज्ञ यह तय करके सब जगह वही रखना है.